धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय.
83, डॉ. ऍनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई-400 018.
दिनांक :- 18 सप्टेंबर, 2002.

**परिपत्रक क्रमांक** 302

विषय :- न्यायिक प्रकरणे निकाली काढण्याबाबत ...

1. असे निदर्शनास आलेले आहे की, ज्या ज्या न्यायिक प्रकरणांत अंतिम सुनावणी (Final hearing) पूर्ण झाल्यानंतर निर्णय (judgment) देण्यासाठी काही अधिकाऱ्यांकडून बराच कालावधी घेतला जातो. या संदर्भात शासनाने गंभीर दखल घेतलेली असून, अशा प्रकरणांच्या तपशीलाबाबतचे विवरणपत्र शासनाने यापूर्वीच मागविलेले आहे. तसेच दिनांक 11/9/2002 रोजी मा. मंत्री महोदय, विधी व न्याय विभाग व प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांनी या कार्यालयांत भेट देवून काही निर्देश दिलेले आहेत. तरी धर्मादाय संघटनेतील सर्व संबंधित न्यायिक अधिकारी यांना असे निर्देश देण्यात येत आहे की, त्यांनी न्यायिक प्रकरणांत अंतिम सुनावणी (Final hearing) पूर्ण झाल्यावर वाद नसलेल्या प्रकरणांत (7) दिवसांच्या आंत निर्णय (judgment) देण्यांत यावा व वाद असलेलया प्रकरणात 15 दिवसांच्या आंत निर्णय (judgment) देण्यात यावा. जर यदाकदाचित वर नमूद केलेल्या कालावधीत निर्णय देणेत आला नाही तर त्याची कारणे नमूद करावीत.

2. असे निदर्शनास आलेले आहे की, विभागीय कार्यालयांत अनेक वाद नसलेली (uncontested) न्यायिक प्रकरणे 6 महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित असून, अशी वाद नसलेली प्रकरणे कोणत्याही परिस्थितीमध्ये 6 महिन्याचे आंत निकाली काढण्यात यावी.

वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन व्हावे यांची सर्व अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

(शि.भि.धुमाळ),
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

दिनांक :- 17/9/2002.

प्रत :-

1. धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, नाशिक, लातूर, अमरावती.
2. सहायक धर्मादाय आयुक्त, बृहन्मुंबई-1,2,3,4, ठाणे, रायगड, धुळे, जळगांव, सांगली, अहमदनगर, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली.